# University of Mumbai

**Offg. Director,**
**Board of Examinations**
**and Evaluation office**
M.J. Phule Bhavan,
Examinations Section,
Vidyanagari Campus,
Mumbai - 400 098.

DBoEE/ZCF/17-18/200

**परिपत्रक :–**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, मार्च/एप्रिल २०१७ च्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे काम On Screen Marking द्वारे सुरू झालेले आहे व विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयांतील प्राध्यापकांचा On Screen Marking साठी नोंदणीअभावी उत्तरपत्रिका तपासणीसाठी अल्प प्रतिसाद मिळत आहे. OSM द्वारे उत्तरपत्रिका तपासणीचा निर्णय हा विद्यापीठाच्या विद्वतसभा व व्यवस्थापन परिषदेने घेतलेला असुन त्याद्वारे उत्तरपत्रिका तपासणी करून वेळेत निकाल जाहिर करणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९३ अन्वये बंधनकारक आहे.

तरी मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन महाविद्यालयांचे प्राचार्य यांना या परिपत्रकाद्वारे पुनश्चः एकदा सूचित करण्यात येते की, OSM द्वारे उत्तरपत्रिका तपासणी सुरू होऊनही आपल्या महाविद्यालयांतील प्राध्यापकांना मोबाईल किंवा मेलद्वारे मेसेज व लॉगीन मिळाले नसेल, किंवा ज्या प्राध्यापकांना मोबाईल वर मेसेज व लॉगीन मिळाले आहेत. परंतु Question Paper Code मध्ये दुरूस्ती असल्यास त्यांचीही सुधारीत माहिती त्वरीत **helpdesk_osm@mu.ac.in** या मेलवर खालील तक्त्यात सॉफ्टकॉपी पाठवावयाची आहे व याची एक प्रत नेमणूक कक्षासही या मेलवर appointmentunit@gmail.com पाठवावयाची आहे.

**माहितीतक्ता**

| Sr. No. | Name of the evaluator | Mobile No. | Email ID | Name of the College | Subject Name | Question Paper Code |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

# University of Mumbai



OSM द्वारे उत्तरपत्रिका तपासणीसाठी संबंधीत प्राध्यापकांची नोंदणी होणे आवश्यक आहे, मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी याची नोंद घ्यावी व आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची माहिती त्वरीत **helpdesk_osm@mu.ac.in** च्या या मेलवर संबंधीत तक्त्यात पाठवावी. उत्तरपत्रिका तपासणीच्या कामामध्ये सहभाग घेणे सर्व महाविद्यालयातील प्राध्यापकांना बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी.

मुंबई – ४०००९८.
दिनांक १५/०६/२०१७

(दिपक वसावे)
स्था. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रति,

सर्व शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक